## पन्नाशीवरच्या नवऱ्यांचे भजन



बायकोशी संसार, सुखाचा करीन
देईन तिला प्रेम, पोती भरूनी........बायकोशी संसार

नको मला माधूरी, वैजयंतीमाला
रेखा आणि राखी, हव्या त्या कशाला
बायको हिच माझी, मधुबाला..........बायकोशी संसार

देऊ नका शपथ, वाईन जीन व्हिस्की
नाही अता चढत, भांग अन् थंडाई
बायको मला फास्ट, नशा देई.........बायकोशी संसार

कधी नाही हिला, नाही मी म्हणीन
सांगेल ती जे काम, मूकाटे करीन
पाळीन आदर्श, पत्निव्रत................बायकोशी संसार

सुहास सांगे लोका, बायकोचे हो ऐका
वाद करु नका, भांडू नका फूका
बायको खूष ठेवा, स्वर्ग हाती, मोक्षप्राप्ती....बायकोशी संसार

सुहास पै